**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १८२ वा ● बुधवार २२ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 182 | Date : 22/11/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## दूध दराबाबत सरकारने बोलावलेली बैठक निष्फळ; शेतकरी संतप्त, आंदोलनाची हाक

मुंबई : दूध दराबाबत आज सरकारने बोलावलेली बैठक निष्फळ ठरली आहे. सरकारने दूध दराबाबत काढलेला आदेश मान्य करण्यास दूध कंपन्यांनी नकार दिला असल्याचे शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितले आहे. त्यामुळे शेतकरी संघटना संतप्त झाल्या असून त्यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. तर, दुसरीकडे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आपण सर्वांची भूमिका ऐकून घेतली आहे. सर्वांनी संयम बाळगला पाहिजे असे म्हटले आहे. बैठकीनंतर आक्रमक झालेल्या दूध उत्पादक शेतकरी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सह्याद्री अतिथीगृहाबाहेर शासकीय आदेशाची होळी करत संताप व्यक्त केला.दूध दर प्रश्र्नी राज्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज २१ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास सह्याद्री अतिथीगृह येथे दूध संघ, दूध कंपन्या आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली होती. ही बैठक निष्फळ ठरली असल्याचा दावा शेतकरी संघटनांनी केला.

राज्य सरकारने आज स्वतःहून पुढाकार घेऊन सगळ्या दूध उत्पादक, शेतकऱ्यांना, संघटना यांची भेट घेतली असल्याचे राधाकृष्ण विखे-पाटील यांनी म्हटले. आजच्या बैठकीत आम्ही सर्वांची भूमिका जाणून घेतली. मध्यंतरी सरकारने पुढाकार घेऊन ३४ रुपये दर जाहीर करत शासकीय आदेश काढला होता. काही दूध संघांनी भाव कमी केले असल्याची माहिती त्यांनी दिली. दुधात भेसळीच प्रमाण वाढत चाललं आहे ही चिंतेची बाब आहे. दुधाची भेसळ कमी होईल, आणि भाव वाढण्यात मदत होईल, असे प्रतिपादन विखे-पाटील यांनी केले. मी सर्वांची भूमिका एकूण घेतली आहे. निर्यातीला आपण जो पर्यंत प्रोत्साहन देत नाही तो पर्यंत पर्याय मिळणार नाही. यावर मार्ग काही तरी काढावा लागेल. पुन्हा बैठक बोलवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुग्धविकास । पान २ वर

## दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला जास्तीत जास्त भाव मिळावा यासाठी शासन सकारात्मक



मुंबई/विजय घनघाव :दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला जास्तीत जास्त भाव मिळावा यासाठी शासन सकारात्मक आहे. त्यांना न्याय देण्यासाठी राज्यातील प्रमुख सहकारी व खासगी दूध संघांनी पुढाकार घेण्याचे आवाहन दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित राज्यस्तरीय बैठकीत केले.

राज्यातील दूध उत्पादकांच्या प्रश्र्नांसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित राज्यस्तरीय बैठकीस दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, । पान २ वर

## शिवसेना आमदार अपात्रता याचिकेवर मॅरेथॉन सुनावणी होणार

मुंबई : शिवसेना आमदार अपात्रता याचिकेवरील सुनावणीला आजपासून पुन्हा सुरुवात झाली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार, आता विधानसभा अध्यक्षांना आमदार अपात्रता सुनावणी पूर्ण करून ३१ डिसेंबरपर्यंत निर्णय द्यावा लागणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या या निर्देशानंतर आमदार अपात्रता याचिकेवरील सुनावणीस वेग आला आहे. विधानसभा अध्यक्षांकडून आता मॅरेथॉन सुनावणी करण्यात येणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रक समोर आले आहे. विधानसभेत आज आमदार अपात्रता सुनावणीत शिवसेना ठाकरे गटाचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांची साक्ष नोंदवण्यात आली. आज दिवसभरातील सुनावणी संपली असून बुधवार, २२ नोव्हेंबर रोजी पुन्हा सुनावणी होणार आहे.

आजच्या कामकाजात शिवसेना




ठाकरे आणि शिंदे गटाच्या वकिलांमध्ये खडाजंगी झाली. शिंदे गटाचे वकील ॲड. महेश जेठमलानी यांनी दिवसभराच्या सुनावणीत ठाकरे गटाचे विधीमंडळ व्हीप सुनील प्रभू यांची साक्ष नोंदवली. जेठमलानी यांनी प्रभूंना अडचणीचे प्रश्र्न विचारले. मात्र, प्रभू यांनी संयमी उत्तरे दिली. आमदार अपात्रता सुनावणी, २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. शिवसेना आमदार अपात्रता याचिकेवर मॅरेथॉन सुनावणी होणार आहे. उद्यापासून, बुधवार २२ नोव्हेंबरपासून २४ नोव्हेंबरपर्यंत सुनावणी होणार आहे. त्यानंतर तीन दिवसांच्या सुट्टीनंतर २८ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर सलग सात दिवस सुनावणी होणार आहे.

रविवारी ३ डिसेंबर रोजीदेखील सुनावणी पार पडणार आहे. यामध्ये शिवसेनेच्या दोन्ही बाजूकडील आमदारांच्या साक्षी । पान २ वर

## श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार

*** जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या समवेत सकल मराठा समाजाची पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे बैठक संपन्न, सकल मराठा समाजाच्या पाच मागण्या मान्य**

*** जिल्हा प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे सकल मराठा समाजाने आंदोलन मागे घेतले, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाशी दोन वेळा बैठका घेऊन चर्चा केली**

*** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाची त्यांच्या मागण्याच्या अनुषंगाने भेट घेणार**



पंढरपूर/सोलापूर/प्रतिनिधीः कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते होत असते. परंतु सकल मराठा समाजाने या शासकीय महापूजेला विरोध केल्याने पेच निर्माण झाला होता. जिल्हा प्रशासनाने सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून समाजाच्या पाचही मागणी मान्य केल्याने मराठा समाजाने आंदोलन मागे घेतले असून दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी कार्तिकी यात्रेनिमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे जिल्हा प्रशासन व सकल मराठा समाजाचे शिष्टमंडळ यांची संयुक्त । पान २ वर

## कार्तिकीची वारी निमित्त कार्तिकीची वारी पंढरीच्या दारी या उपक्रमाचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कार्तिकीची वारी पंढरीच्या दारी पर्यावरण शिक्षणाचे धडे देई घरोघरी या उपक्रमाचे आयोजन कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात येत असल्याचे उप प्रादेशिक अधिकारी निखिल मोरे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

पंढरपूरच्या वारीला शतकानुशतके भागवत संप्रदायाची परंपरा आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या दिवशी साजरी होणारी आषाढ वारी आणि कार्तिक महिन्याच्या एकादशीला साजरी होणारी कार्तिकी वारी ही वारकरी संप्रदायासाठी आनंदाची पर्वणी असते. संपूर्ण विश्र्वात सातशे वर्षाहूनही अधिक काळ वारकरी संप्रदायाची ही वारी दिवसेंदिवस लोकाभीमुख चळवळ म्हणून वृध्दींगत होत आहे.

या वर्षी कार्तिकी एकादशी दि. २३ नोव्हेंबर २०२३ रोजी साजरी होणार आहे. कार्तिकी एकादशीच्या पुर्व संध्येला राज्याचे मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या शुभ हस्ते पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ह.भ.प पुर्वा काणे, संगीत नाटक अकादमी विजेत्या भारुडकार चंदाबाई तिवाडी, झी मराठी फेम शाहिर देवानंद माळी हे लोककलावंत त्यांच्या पथकासह सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात किर्तन, प्रवचन, भारुड, पोवाडा अशा लोककला प्रकारांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जाणार आहे. या उपक्रमात प्लॅस्टिक पिशवीचा वापर टाळा, विजेची बचत (सिएफएल बल्बचा वापर करा) पाण्याचा अतिरिक्त वापर टाळून पाण्याचे नियोजन करा, प्लास्टीकचा वापर टाळा, वृक्षतोड टाळा, सेंद्रिय खताचा वापर करुन शेती करा, घरातील प्रत्येक माणसाने वर्षभरात किमान एक झाड लावावे व त्याचे संगोपन करावे, शेतीसाठी। पान २ वर

## बॉलरची दिरंगाई टीमला महागात पडणार, ५ धावांची पेनल्टी लागणार

नवी दिल्ली : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (ICC) नवीन नियम गोलंदाजांच्या विरोधात असल्याचा सूर उमटत असताना आता आयसीसीने आणखी एका नियमात बदल केला आहे. आगामी एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यामध्ये गोलंदाजाने पुढील षटक टाकण्यासाठी ६० सेकंदांपेक्षा जास्त वेळ घेतल्यास, गोलंदाजी करणाऱ्या संघाला ५ धावांचा दंड ठोठावला जाईल. डावात तिसऱ्यांदा. हा नियम सुरुवातीला चाचणी म्हणून वापरला जाणार आहे. हा नियम पुरुषांच्या क्रिकेट सामन्यात लागू होणार असल्याचे मंगळवारी आयसीसीने सांगितले.

आयसीसी बोर्डाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे की, 'मुख्य कार्यकारी समितीने मान्य केले की डिसेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ या कालावधीत पुरुषांच्या । पान २ वर

## मतदार संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम; मतदान केंद्रावर विशेष शिबीराचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः मतदार संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील २४८ - सोलापूर शहर उत्तर व २४९ - सोलापूर शहर मध्य मतदार संघातील सर्व मतदान केंद्रावर दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०२३ या दिवशी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले असून मतदार नोंदणी अधिकारी (बीएलओ) उपस्थित राहणार आहेत. नागरीकांनी मतदार नोंदणी, दुरुस्ती, व वगळणीचे अर्ज भरुन मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे द्यावेत, असे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

मतदार नोंदणीसाठी नमुना -०६ भरणेसाठी आवश्यक कागदपत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे १) मतदाराचा पासपोर्ट आकारातील फोटो (फोटोच्या मागील बाजुस व्हाईट बॅकग्राऊड असावे) २) मतदाराचे जन्म । पान २ वर




## ६५ एकरात लाखांवर भाविक दाखल: प्रशासन सज्ज

### ४९७ प्लॉट पैकी २७८ चे वाटप, १०६ दिंड्या दाखल : प्रांताधिकारी गजानन गुरव

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिकी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा गुरुवार दि. २३ रोजी साजरा होत आहे. एक दिवसावर सोहळा येवून ठेपला आहे. त्यामुळे संताचे लहान मोठे पालखी सोहळे पंढरपूर नजीक दाखल झाले आहेत. तर येथील ६५ एकर येथे देखील लाखांवर भाविक दाखल झाले आहेत. येथील ४९७ पैकी २७८ प्लॉटचे बुकींग देखील पुर्ण झाले आहे. भाविक राहुट्या, तंबू, मंडप उभारुन वास्तव्य करु लाागले आहेत. ६५ एकरात भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिली.




कार्तिकी यात्रेसाठी चंद्रभागात नदीवाळवंटात उभारण्यात येत असलेल्या राहुटयांना चंद्रभागा नदीपलीकडील ६५ एकरात दिंड्यांना राहण्यासाठी प्रशासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. येथील सर्वच्या सर्व ४९७ प्लॉटचे वाटप करण्यात येणार आहे. मंगळवार दि. २१ रोजी दुपारी २७८ प्लॉटचे वाटप करण्यात आले असून १०६ दिंड्या दाखल झाल्या आहेत. तर येथे १ लाख ९० हजार १० भाविक दाखल झाले आहेत. सद्या तंबू, राहुट्या उभारून भाविक येथे वास्तव्य करत आहेत. भजन, कीर्तन व प्रवचनात भाविक दंग झाले असल्याने भक्ती सागर विठ्ठल भक्तीत दंग झाल्याचे चित्र दिसून येते.

पंढरपूर नगरपालिकेच्यावतीने या परीसरात कायम स्वरुपाची ८०० शौचालये तर तात्पुरती ४०० शौचालये उभारण्यात आली आहेत. पिण्यासाठी नळाव्दारे पाणी, पाण्याचे टँकर उभारण्यात आले आहेत. तर लाईटची सुविधा मोफत दिली आहे. विजवितरण कडून २० जोडण्यात देण्यात आल्या आहेत. तर गॅस जोडणी देखील देण्यात येत असून तपासणी। पान २ वर

## संपादकीय

### संस्कारांची उजळणी..

स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या अकराव्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला दादरच्या शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळासमोरच शिवसैनिक शिवसैनिकाला भिडल्याचे दयनीय दृश्य बघायला मिळाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसैनिक एक शिंदे गट आणि ठाकरे गट अशा दोन गटांत विभागले गेले आहेत. शिवसेनेतील फुटीपासून ते आजपर्यंत शिवसैनिक अनेकदा एकमेकांसमोर उभे ठाकलेत. मुख्यत्वेकरून शिवसेना शाखा ताब्यात घेण्यासाठी दोस्ती-यारी सर्वकाही विसरलेत. अनेक वर्षे एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम केलेल्या शिवसैनिकांची हमरीतुमरीपासून एकमेकांची डोकी फोडण्यापर्यंतची मजल गेल्याचे वेळोवेळी दिसले आहे. १७ नोव्हेंबर हा बाळासाहेबांचा स्मृतिदिन असल्याने या दिवशी त्यांना अभिवादन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून असंख्य शिवसैनिक दरवर्षी शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळावर येतात. शिवसेनेतील फुटीनंतर बाळासाहेबांच्या नावाने राजकारण करणाऱ्या दोन्ही गटातील नेत्यांसाठी बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळासमोर नतमस्तक होणे ही अतीव श्रध्देची बाब बनली आहे. शिंदे बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेऊन गेल्यावर ठाकरे गटाचे नेते आणि आमदार ॲड. अनिल परब, खासदार अनिल देसाई आपल्या शिवसैनिकांना घेऊन शिवाजी पार्क येथे हजर झाले. यावेळी शिंदे गटाच्या आरोपांनुसार ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी स्मृतिस्थळाचे गोमूत्र शिंपडून शुद्धिकरण करण्याचा प्रयत्न केल्यावर वादाला सुरुवात झाली. यावेळी मुंब्र्यात उध्दव ठाकरेंना अडवण्यात पुढे असलेले शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के, आमदार सदा सरवणकर आणि शीतल म्हात्रे तेथे उपस्थित होते. त्यांना पाहून खवळलेल्या ठाकरे गटाच्या आणि शिंदे गटाच्या शिवसैनिकांमध्ये वादावादी सुरू झाली. घोषणाबाजी करत कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी राज्य राखीव दलाची अतिरिक्त कुमक मागवून परिस्थिती नियंत्रणात आणली. या राड्यानंतर बोलताना ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या नेत्यांनी एकमेकांवर बाळासाहेबांचे विचार आणि संस्कार विसरल्याचा जोरदार आरोप केला. या दोन्ही गटातील नेत्यांचे दावे ऐकून एकेकाळी राडा संस्कृतीच्या जोरावर राज्यात पक्षाची पाळेमुळे मजबूत केलेल्या कडवट शिवसैनिकांनी तसेच सध्याच्या राजकारणात आपापला गट धरून सत्ताकारणाची स्वप्ने बघणाऱ्या ताज्या दमाच्या शिवसैनिकांनी बाळासाहेबांचे विचार आणि संस्कारांची उजळणी करण्याची गरज नाही.

# विज्ञानाचा आधार घेऊन अज्ञानाचा प्रचार..

भारताकडे सर्वकाही मुबलक प्रमाणात असूनही भारत मागे असण्याचे कारण म्हणजे देशात माणसा माणसात विषमता पाळून केलेला माणसाचाच द्वेष व स्वतःला शिक्षीत समजून ही प्रचंड अंधविश्र्वास, पाखंड व भोंदूगिरी ला जोपासून त्याचा संबध थेट धर्माशी जोडून भावनिक होऊन अंधविश्र्वास पाखंड व भोंदुगीरी जोपासण्या साठी सर्वतोपरी पणाला लावणे हेच कारणे आहेत. विषमतेची घाण डोक्यात असल्याने गुणवत्ता, पात्रता यापेक्षा जातीला जास्त महत्त्व दिले जाते याचे असंख्य उदाहरणे आपल्या देशात आजही ज्वलंत आहेत. वैयक्तिक प्रगती होत असताना देशात विज्ञानाचा आधार घेऊन अज्ञान व अंधविश्र्वास पसरवणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. शिक्षीत वर्गही अंधविश्र्वास, पाखंड व भोंदूगिरी मध्ये जास्त फसलेला असून अंधविश्र्वासाचा संबंध थेट धर्माशी जोडून स्वतः चे अज्ञान अजून मजबूत करतो. विज्ञानाच्या प्रगती मुळे मोबाईल हाती आला आणि या मोबाईल च्या माध्यमातून अंधविश्र्वास पाखंड यालाच खतपाणी घालणे सुरू केले. अमूक अमुक मॅसेज एकवीस लोकांना फॉरवर्ड करा सांयकाळ पर्यंत चांगली बातमी ऐकायला मिळेल. अमुक अमुक जप करा, नाव उच्चारा अडचण दुर होईल. स्वतः ला शिक्षीत आणि गुणवान समजणाऱ्या लोकांनी असे केले तर अंगी गुणवत्ता आहे तरी कोणती हा प्रश्र्न सहज निर्माण होतो. भोंदूगिरी, जादुटोना यांच्या मार्फत अज्ञानाची जोपासना केली जाते आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण होते तरीही लोकांना ते हवे हवे वाटते. शिकलेल्या लोकांना सत्य कळत नसेल, तर्क करता येत नसेल तर त्या शिक्षणाचा व गुणवत्तेचा संबंध येतोच कुठे? महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले ज्यांनी आयुष्यभर एकाही व्यक्तीला न लुबाडता, किर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन करताना एकही रुपया न घेता, कोणत्याही व्यक्तीला अंगारा, धागा दोरा न देता आणि अंगारा धागे दोरा याने आजार, समस्या दुर होतात असा कोणताही दावा न करतात येथे वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे काम केले. डोक्यात अंधविश्र्वास व पाखंड, थोतांड जोपासणाऱ्या लोकांनी संताचे विचार वाचले तर नाही उलट संताना घरात सुद्धां आणले नाही. आजही अपवाद वगळता प्रत्येक घरात अंधविश्र्वास, पाखंड, थोतांड व भोंदूगिरी ला खतपाणी घालणाऱ्या अज्ञानाच्या अनेक गोष्टी मिळतील परंतू ज्यांनी डोक्यातील अज्ञान दुर करून अंधविश्र्वासाच्या चक्रातून बाहेर पडण्याची शिकवण दिली अशा वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या संत महापुरुषांचे फोटो यांच्या घरात दिसत नाहीत. सार्वजनिक ठिकाणी अंधविश्र्वास, पाखंड आणि भोंदूगिरी सुरू असेल तर विज्ञानामुळे हाती आलेल्या मोबाईल च्या कॅमेऱ्यातून अज्ञानाचा प्रचार केला जातो तेव्हा मात्र शिक्षणाचा अर्थच कळाला नाही याची खंत वाटून बौद्धिक पातळी सुधारली नाही याची काळजीही वाटते. कारण बौद्धिक पातळी सुधारली नाही तर अशा लोकांकडून चुकिच्या गोष्टी करून घेणे सोपे जाते. आणि आज तेच होत आहे. शिकलेल्या लोकांकडून चुकिच्या गोष्टी करून घेऊन अडाणी भोंदु बुवा ने लुबाडल्याचे समोर आले. अर्थात अडाणी भोंदू करून पुजा हवन करण्यासाठी त्याला लाखो रुपये द्यायचे याला अज्ञान नाही तर बौद्धिक गुलामी म्हणतात. जर पुजा होम हवन करून घरात सुख शांती समृद्धी येत असेल तर पुजा करणारा पैसे घेऊन पुजा का करतो? त्याच पुजा हवन मधून त्याला ही सर्व काही मिळायला पाहिजे ना? अंधविश्र्वासाचा संबंध धर्माशी जोडून अंधविश्र्वासाला चिकटून बसतात. आणि अंधविश्र्वास, पाखंड भोंदूगिरी वर बोलले की यांना धर्म विरोधी वाटतात. अनेक भोंदु लोकांनी अंधविश्र्वास पसरवून लोकांचा पैसा, बायका लुटून अत्याचार केले तरीही लोक त्यांना दैव पुरुष, देवाचा अवतार, देवाची कृपा मानतात. या सर्व अंधविश्र्वास थोतांड, भोंदुगीरीचा संबंध धर्माशी जोडून त्याचे जतन करण्यात धन्यता मानणाऱ्यांनी धन्यता मानावी यामध्ये काहीही शंका नाही. परंतु धर्माच्या नावाखाली पोसली गेलेला अंधविश्र्वास, पाखंड, थोतांड हे धर्मापुरतेच मर्यादित ठेवावे त्याला सार्वजनिक करू नये. सार्वजनिक केले तर प्रश्र्न उपस्थित होणारच. सार्वजनिक म्हणजे काय तर जसे देशाचे संरक्षण करण्यासाठी राफेल हजारो करोडो रुपये खर्च करून विकत घेतले. आणि राफेल ची पुजा करून त्याला निंबु मिरची बांधण्यात आली. आता निंबु मिरची बांधून नेमकं काय साध्य करायचे हा प्रश्र्न तर उठणारच ना? राफेल कोणाच्या वैयक्तिक मालकीचे, वैयक्तिक धर्माचे आहे का? मग तेथे अंधविश्र्वास व पाखंड कसा पसरवला जातो? देशाच्या संसद भवनाचे उद्घाटन करताना होम हवन करण्या मागचा काय उद्देश? काय साध्य झाले? सध्या चा ज्वलंत मुद्दा तो म्हणजे जागतिक क्रिकेट चषक स्पर्धेमध्ये बीसीसीआयचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टिम जिंकण्यासाठी देशात अनेक ठिकाणी होम हवन करण्यात आले,

अनेकांनी भविष्य वाणी केली आहे बिसीसीआय टीम जिंकेल असे भाकीत वर्तवले गेले. ह्या गोष्टी विज्ञानाच्या प्रगती मुळे तयार झालेल्या कॅमेरा, सॅटेलाईट च्या माध्यमातून टीव्ही, व सोशल मिडियावर मोठ्या उत्साहाने शेअर करण्यात आले. परंतु टीम हरली. होम हवन करून ही टीम हरत असेल तर होम हवन पुजा करून काय फायदा? पुजा होम हवन करून जर पाहिजे ते मिळत असेल तर मेहनत कशाला करायची हा प्रश्र्न साहजिकच उभा राहतो. परंतु विज्ञानाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर अज्ञानाचा प्रचार करण्यासाठी केला जातो आणि बहुसंख्य लोक त्यावर विश्र्वास ठेवतात तेव्हा कळते देशात बहुतांश गुणवत्ता कोणती आहे? विज्ञानामुळे हातात कॅमेरा, माईक असणाऱ्या एकाही पत्रकाराने एकही प्रश्र्न विचारला नाही की होम हवन पूजा भविष्य वाणी करूनही जर बीसीसीआय ची टीम हरलीच तर हे सर्व अंधविश्र्वास व पाखंडाचा भाग आहे असे म्हणावे का? पुजा होम हवन करून जर कप किंवा यश मिळाले असते तर भारतात सर्वच कप आणि सर्वच यश असते. असा एकही प्रश्र्न कोणी विचारला नाही. यालाच माणसिक गुलामी म्हणतात. देशात अंधविश्र्वास पाखंड थोतांड व भोंदूगिरी यावर जास्त विश्र्वास ठेवून ते पैसा कमवण्याचे माध्यम असल्याने देशात पाखंड पसरवणाऱ्या भोंदुची संख्या जास्त आहे. जगाच्या पाठीवर सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशात आणि अनेक दैवशक्ती, देवाचे दुत, चमत्कार असलेल्या देशात विज्ञानाच्या जोरावर किती जगविख्यात शास्त्रज्ञ झाले? अज्ञान परसवणारे भोंदु हजारो करोडेचे मालक झाले,. परंतु चंद्रयान बनवणारे शास्त्रज्ञ उपाशी आहेत. त्यांना पगारही नाही मिळाला. हि वस्तू स्थिति आहे. आपण वापरत असलेल्या मोबाईल, टीव्ही, रेडिओ, घड्याळ फॅन, फ्रीज, मोटारसायकल, कार, एसी, विद्युत, बल्ब, लॅपटॉप, संगणक यापैकी किती उपकरणाचा शोध भारतीय लोकांनी लावला? इतरांनी विज्ञानाची केलेली प्रगती आपण पैसे देऊन खरेदी करतो आणि त्यावरही अज्ञानच पसरवतो म्हणजे आपण कीती विद्वान आहोत? भारतात जसे भोंदू, होम हवन, चमत्कार, पाखंड आहे तसे इतर कोणकोणत्या देशात आहे? पण भोंदुगीरी, पाखंड, अंधविश्र्वासावर देशात धंदा सुरू आहे, आणि हा धंदा दिर्घकाळ सुरू राहण्यासाठी धंदा चावलणारे मालक अंधविश्र्वास पाखंड भोंदुगीरीला मजबूत करत आहेत. आणि बौद्धिक विकास न झालेले लोक लवकर आकर्षित होऊन फसत आहेत.

अज्ञान आणि अंधविश्र्वास जोपासल्या मुळे आपण वैज्ञानिक क्षेत्रात पाहिजे तसी प्रगती करू शकलो नाही. आणि आजही आपण बाहेरच्या प्रगत राष्ट्राकडून आदर्श घेऊन जागृत होत नाही तर देशातील भोंदु अडाणी जो शिकलेल्या लोकांना अज्ञानाचा आधार घेऊन लुबाडतो अशा लोकांकडे जाऊन जिवनात सुख, यश, अपत्य प्राप्ती साठी याचना करतो. आणि हे सर्व विज्ञानाच्या मोबाईल मध्ये बंध करून आपले अज्ञान दाखवण्यासाठी विज्ञानामुळे तयार झालेल्या सोशल मिडियावर शेअर करतो. म्हणून देश वैज्ञानिक दृष्टीने मागास तर आहेच पण वैज्ञानिक दृष्टिकोन न स्विकारल्याने बौद्धिक दृष्टीने ही मागास आहे. डोक्यात अंधविश्र्वास, पाखंड भोंदुगीरी जोपासणारे आणि विज्ञान व सत्य नाकारणारे लोक कोणत्या बाबतीत बुद्धीजीवी, हुशार व गुणवंत होतील हा संशोधनाचा विषय असेल.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### दूध दराबाबत सरकारने बोलावलेली

मंत्र्यानी दूध संघ, दूध कंपन्या व शेतकरी प्रतिनिधींची दुध दराबाबत बोलावलेली बैठक निष्फळ ठरली आहे. सरकारने काढलेला दूध दर आदेश दूध कंपन्यांनी धुडकावून लावला असून सरकारने जाहीर केल्याप्रमाणे ३४ रुपये दर देण्यास नकार दिला असल्याची माहिती दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे राज्य समन्वयक डॉ. अजित नवले यांनी म्हटले. सरकारच्या आदेशाची अशी अवहेलना होत असताना सरकार आजच्या बैठकीत केवळ गुळमुळीत सारवासारव करताना दिसले असल्याचा आरोप त्यांनी केला. आमदार सदाभाऊ खोत यांनीदेखील शासनाने काढलेल्या आदेशापेक्षाही ९ ते १० रुपये कमी दर मिळत असल्याचे म्हटले.

सरकारच्या आदेशाची किंमत रद्दीची असल्याचे यामुळे सिद्ध झाले आहे. असे रद्दी शासनादेशाची २४ नोव्हेंबर रोजी दूध संकलन केंद्रांवर राज्यभर शेतकऱ्यांनी होळी करावी आणि विविध मार्गाने आंदोलन तीव्र करावे असे आवाहन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केले आहे. राज्यभर शेतकरी कार्यकर्ते उपोषण, रास्तारोको व दुग्ध अभिषेक घालून दूध दराच्या प्रश्नांसाठी आंदोलन करत आहेत. अशा सर्व आंदोलनांना संघर्ष समिती पाठिंबा व्यक्त करत असल्याचे दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे राज्य समन्वयक डॉ. अजित नवले यांनी सांगितले.

### दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या..

दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे डॉ. अजित नवले, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. (महानंद) मुंबईचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील आणि रयत क्रांती संघटनेचे पदाधिकारी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. हेमंत वसेकर, दुग्ध व्यवसाय विकास आयुक्त अजित पवार, अन्न व औषध प्रशासन आयुक्त अभिमन्यू काळे, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ विभागीय प्रमुख आणि राज्यातील प्रमुख सहकारी व खासगी दूध संघाचे प्रतिनिधी, पशुखाद्य उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### शिवसेना आमदार अपात्रता

नोंदवण्यात येणार आहे. त्याशिवाय, व्हीप बजावणाऱ्या कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांचीही साक्ष नोंदवण्यात येणार असल्याची माहिती आहे.

शिवसेनेच्या आमदारांनी दाखल केलेल्या ३४ याचिकांचे सहा गट करून ही सुनावणी घेण्यात येणार आहे. शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील निर्णय ३१ डिसेंबरपर्यंत घ्या, असे निर्देश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिले होते. त्यानंतर आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी कंबर कसली असून शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधीमंडळ नव्याने वेळापत्रक तयार करण्यात आले. ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत देत एक प्रकारचा थेट अल्टिमेटमच सर्वोच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना दिला आहे. विधानसभा अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयानं दिलेली डेडलाईन पाळली नाहीतर मात्र सर्वोच्च न्यायालय या प्रकरणात हस्तक्षेप करुन एक निश्चिच तारीख किंवा निश्चित वेळमर्यादा ठरवण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### मतदार संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम;

तारखेचा पुरावा यामध्ये खालील पैकी एक कागदपत्र आवश्यक आहे. (१) जन्म दाखला (२) आधारकार्ड (३) पॅन कार्ड (४) ड्रायव्हिंग लायसन्स (५) पासपोर्ट (६) १० वी १२ बोर्ड सर्टीफिकेट ज्यावर जन्म तारीख नमूद असावी. (७) जन्म तारीख नमूद असलेला अन्य कोणताही पुरावा.

३) रहिवासाचा पुरावा यामध्ये खालील पैकी एक कागदपत्र आवश्यक आहे. (१) बॅंक / किसान/ पोस्ट ऑफिस करंट पासबुक (२) रेशन कार्ड (३) पासपोर्ट (४) ड्रायव्हिंग लायसन्स (५) इनकम टॅक्स असेसमेंट ऑर्डर (६) भाडे करारनामा (७) पाणी / दूरध्वनी/ लाईट / गॅस कनेक्शन बिल (८) अर्जदाराचे नांवे पोस्ट विभागामार्फत पोहोच झालेले कोणतेही पत्ता नमूद केलेले कागदपत्र मयत, स्थलांतरीत मतदारांचे वगळणीसाठी त्यांनी अथवा त्यांचे रक्तसंबंधातील नातेवाईकांनी नमुना -७ चे अर्ज भरुन सादर करावेत. तसेच मतदार यादीतील दुरुस्तीसाठी नमुना - ८ मधील अर्ज व ज्या बाबीची दुरुस्ती करावयाची आहे त्या संबंधित कागदपत्र जोडणे आवश्यक आहे. नागरीकांनी मतदान केंद्रावर उपस्थित राहून विशेष शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन सदाशिव पडदुणे उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र १ व श्री सैपन नदाफ, तहसिलदार उत्तर सोलापूर यांनी केले आहे.

### बॉलरची दिरंगाई टीमला

वनडे आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 'स्टॉप क्लॉक' चा वापर प्रायोगिक तत्वावर केला जाणार आहे.

या स्टॉप क्लॉकचा वापर दोन षटकांमध्ये जाणाऱ्या वेळेवर लक्ष ठेवण्यासाठी केला जाणार आहे. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, 'मागील षटक संपल्यानंतर ६० सेकंदांच्या आत गोलंदाजी सुरू करावी लागणार आहे. एकाच डाव्यात तिसऱ्यांदा हा प्रकार घडला तर पाच धावांचा दंड ठोठावला जाईल.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या यजमानपदांवर खेळपट्ट्यांवर बंदी घालण्याची पद्धतही आयसीसीने बदलली आहे. आयसीसीने सांगितले की, 'खेळपट्टी आणि आऊटफिल्ड मॉनिटरिंग नियमांमधील बदलांनाही मान्यता देण्यात आली आहे, ज्यात खेळपट्ट्यांचे मूल्यांकन कोणत्या निकषांवर केले जाणे सोपे होईल. एखाद्या मैदानाचा आंतरराष्ट्रीय दर्जा हटवण्यासाठी आता पाच वर्षात डिमेरिट अंकांची संख्या पाचवरून सहा करण्यात आली आहे.

### कार्तिकीची वारी निमित्त कार्तिकीची

पाण्याचा अतिरिक्त उपसा न करता मर्यादित कालावधीत शेतीपंप चालवावा, ओला कचरा सुका कचरा वेगळा करुन ओल्या कचऱ्यातून सेंद्रिय खताची निर्मिती करावी अशा विविध संदेशांची पखरण लोक कलांच्या माध्यमातून केली जात असते. वारीत सहभागी होणाऱ्या ग्रामीण जनतेला लोककला प्रकार हा अत्यंत जवळचा असल्याने या माध्यमातून लोकजागृतीचे नविन साधन समोर आले आहे व ते यशस्वी होत असल्याचे पत्रकात नमूद आहे.

### ६५ एकरात लाखांवर भाविक

केलेल्यांची संख्या २० आहे. ६५ एकर येथे सुरक्षा, वैद्यकीय सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आल्याने भाविकांची गैरसोय थांबली आहे. भजन, किर्तनाची सेवा येथेच पार पाडली जात असल्याने भक्तीसागरात भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. येथे अत्यावश्यक सेवासुविधा पुरवण्याबरोबर खासगी दुकानदारांनी प्रासादिक साहित्याची दुकाने, हॉटेल, खेळणी आदींची दुकाने उभारण्यात आली आहेत. सोमवार पासून ६५ एकरात दिंडया वास्तव्यास येवू लागल्या आहेत. तर मंगळवारी येथील २७८ प्लॉटचे वाटप पुर्ण केले आहे. भाविक तंबू, राहुट्या उभारत या ठिकाणी भाविक वास्तव्य करु लागले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून येथे भाविकांना मोफत जागा, पिण्याचे शुद्ध पाणी, वीज, प्रथमोपचार सेवा, पोलिस संरक्षण आदी सुविधा पुरण्यात आल्या आहेत. भाविकांना २४ तास सेवा देण्यासाठी येथे आपत्कालीन मदत केंद्र कार्यरत ठेवण्यात आले असल्याचे प्रांताधिकारी गुरव यांनी सांगितले.

### श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय

बैठक घेण्यात आली, त्याप्रसंगी जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले,मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव तसेच सकल मराठा समाजाचे प्रतिनिधी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधींनी कुणबी जातीच्या नोंदी वेगाने शोधणे, मराठा भवन बांधणे, सारथीचे उपकेंद्र सुरू करणे, मराठा विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधणे व मराठा आरक्षणासंदर्भात चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री यांचा वेळ मिळणे या मागण्या करण्यात आल्या. त्यावर जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मराठा समाजाने केलेल्या उपरोक्त पाचही मागण्या तात्काळ मान्य केल्या.

प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक भूमिकेच्या अनुषंगाने सकल मराठा समाजाने उपमुख्यमंत्री यांना शासकीय महापूजा करण्यास केलेला विरोध व आंदोलन मागे घेतले असून शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपमुख्यमंत्री हे कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे समाजाच्या वतीने सांगण्यात आले.

जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधीशी दुसऱ्यांदा बैठक घेऊन मराठा समाजाचे आंदोलन मागे घेण्याबाबत महत्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्ह्यातील कुणबी पुरावे नोंदी गोळा करण्याची मोहीम गतीने सुरू असून त्यात अधिक गती यावी यासाठी सर्व संबंधित तहसीलदार व प्रांताधिकारी यांना सुचित करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. त्याप्रमाणेच पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्यासाठी पालकमंत्री यांच्याशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच प्रांताधिकारी यांना मराठा भवनसाठी जागा शोधण्याबाबत ही कळविण्यात आले असून बांधकामासाठी निधीची ही तरतूद करण्याचे प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले. पंढरपूर येथे सारथी चे उपकेंद्र सुरू करण्याबाबत शासनाला लवकरच प्रस्ताव पाठविण्यात येणार असून त्यासाठी पाठपुरावाही केला जाईल. तसेच विद्यार्थी वस्तीगृह साठी ही प्रयत्न केले जाणार असून मराठा आरक्षणासंदर्भात चर्चा करण्यासाठी सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाला उपमुख्यमंत्री महोदय हे वेळ देणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. त्यामुळे सर्व सकल मराठा समाजाचे प्रतिनिधी यांनी त्यांचे आंदोलन मागे घेत असल्याचे बैठकीत सांगितले.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले करवीरनिवासिनी श्री अंबाबाईचे सहकुटुंब दर्शन



कोल्हापूर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कोल्हापूर येथे करवीरनिवासिनी श्री महालक्ष्मी अंबाबाईच्या मंदिराला भेट देऊन सहकुटुंब दर्शन घेतले. तत्पूर्वी कोल्हापूर विमानतळावर मुख्यमंत्री श्री. शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे स्वागत राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आबिटकर, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, माजी आमदार चंद्रदीप नरके यांनी केले. यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. राज्यामध्ये सर्वांना सुखसमृद्धी लाभावी, अशी मागणी देवीकडे केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# रमाई आवास घरकुल योजनेतील एक ही लाभार्थी वंचित राहाणार नाही; नगर प्रशासनाचा दिलासा

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या मध्यस्ती नंतर उपोषण मागे



नळदुर्ग /दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग शहरातील शासकीय जागेवर राहणाऱ्या कुटूंबियाच्या घर जागेची नगरपरिषद दप्तरी नोंद करुन प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजनेचा लाभ मिळावे या करिता नगरपरिषद कार्यालयसमोर वसंतनगर, दुर्गानगर, इंदिरानगर, बौध्दनगर, भिमनगर, डॉ आंबेडकर नगर येथील नागरिकांनी आमरण उपोषण सुरु केले होते परंतू लाभार्थांना स्वतःच्या नावे जागा नसल्याने रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी विलंब होत होता अनेक वर्ष झाली शासकीय जागेवर पत्र्याचे छप्पर व दगड मातीचे घर करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत . येवढा पाठ पुरावा करून पण नगर परिषद या अतिक्रमण धारकांची दखल घेतली नाही म्हणून १६ नोहेंबर २०२३ पासून

नळदुर्ग येथे नगर परिषदे समोर अमरण उपोषण सुरु करण्यात आले हे अमरण उपोषण कल्पनाताई गायकवाड पत्रकार दादासाहेब बनसोडे माजी नगरसेविका क्षमाताई राठोड यांच्या नेतृत्वाखाली १०० ते २०० नागरीकासह हे उपोषण करण्यात आले

एकुण १८ लाभार्थी अमरण उपोषणास बसले तर काहीनी माघार घेतली दोन दिवसा नंतर उपोषण कर्ते दादासाहेब बनसोडे यांची प्रकृती खालावली बि पी लो आणी शुगर लो मुळे तब्येत बिघडली त्यामुळे त्यांना उपजिल्हा रुग्णालयात हालविण्यात आले त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले सतत चार दिवस चार उपोषण चालु होते यावेळी डॉ सुरेंद्र मडके डॉ जीडगे डॉ आदम शेख , परिचारीका बिरंजे , शिंदे , मसतुद अदिनी उपचार देण्यास सुरुवात केली

गेल्या पन्नास वर्षांपासून शासकिय जागेवर कब्जे वहिवटीनुसार राहणाऱ्या कुटूंबाच्या घरजागेची नगरपरिषद कार्यालयात नोंद करून

रमाई आवास घरकुल योजने पासून एक ही नागरीक वंचित राहाणार नाही यांची पुर्ण दक्षता नगर परिषद घेणार शिवाय सर्व्हे नंबर २९ मधील नागरीकांचे सर्व्हेक्षण झाले आसल्याचे पत्रकात म्हटले आहे .

नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार व कार्यालयीन अधिक्षक दिपक कांबळे यांचे लेखी अश्र्वासन आणी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या मध्यस्ती मुळे भिमनगर बुद्धनगर डॉ आंबेडकर नगर मधील शासकीय जागेवर राहात आसलेल्या लाभार्थांचा प्रश्र्न मार्गी लागल्याने चौथ्या दिवशी हे अमरण उपोषण मागे घेण्यात आले . यावेळी शिवसेनेचे कमलाकर काका चव्हाण काँग्रेसचे पांडू पुदाले शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्र्वर घोडके भाजपाचे संजय बताले अदिजन उपस्थित होते .

# बल्लारपूरच्या क्रीडा संकुलात होणार राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा

चंद्रपूर : विसापूर (ता. बल्लारपूर) येथील तालुका क्रीडा संकुलात २७ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा खऱ्या अर्थाने जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरणार आहे. या निमित्ताने चंद्रपूरकरांना राष्ट्रीयस्तरावरील क्रीडा स्पर्धांचा आनंदही घेता येणार आहे. २०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा घेण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. त्यामुळे मिशन ऑलिम्पिकच्या निमित्ताने उत्कृष्ट खेळाडू घडविण्याचे उद्दिष्ट ठेऊनच बल्लारपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे नियोजन करावे, असे निर्देश वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत. त्याचवेळी या स्पर्धा अतिशय दर्जेदार आणि उत्तम होतील, असा विश्र्वास क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

पालकमंत्री श्री. मुनगंटीवार आणि क्रीडा मंत्री श्री. बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजन सभागृह येथे क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा आढावा घेण्यात आला.

यावेळी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, हरीश शर्मा, देवराव भोंगळे, राहुल पावडे यांच्यासह विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, 'बल्लारपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातूनच मिशन ऑलिम्पिकची सुरुवात झाली पाहिजे. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून जवळपास ३ हजार खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक, पंच, पालक, क्रीडा प्रशिक्षक आदी लोक सहभागी होणार आहेत. त्यामुळे उत्तम आयोजन व नियोजनासाठी अधिकाऱ्यांच्या पथकाने सज्ज राहावे आणि कामांचे उत्तम नियोजन करावे, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले. यावेळी जेवणाचा दर्जा व भोजनाच्या ठिकाणची स्वच्छता या दोन्हीकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

चंद्रपूर जिल्ह्यात होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात होत आहेत. त्यामुळे येथील स्पर्धा दर्जेदार होणार, यात तिळमात्र शंका नाही, असा विश्र्वास क्रीडा मंत्री श्री. बनसोडे यांनी व्यक्त केला.राज्याच्या क्रीडा विभागाकडून या स्पर्धेसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. मिशन ऑलिम्पिक २०३६ ची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्याची सुरुवात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने चंद्रपुरातून होईल, असेही ते म्हणाले.

पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी जिल्ह्यात खेळाच्या अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. ते म्हणाले की, 'तीन वर्षांपासून रखडलेले शिवछत्रपती पुरस्कार व जीवन गौरव पुरस्कारांचे वाटप नुकतेच करण्यात आले आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली असून सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूंना १ कोटी रुपये, रौप्य पदक प्राप्त खेळाडूंना ७५ लक्ष रुपये, तर कांस्य पदक प्राप्त खेळाडूंना ५० लक्ष रुपये देण्याचा निर्णय क्रीडा विभागाने घेतला आहे. तसेच पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ तर छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ प्रस्तावित आहे. पुणे येथे ऑलिम्पिक भवनाकरीता पहिल्या टप्प्यात ७५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

मेजर ध्यानचंद यांच्या नावाने २९ ऑगस्ट हा क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तर पहिले ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या नावाने आता १५ जानेवारी रोजी महाराष्ट्र क्रीडा दिन साजरा करण्यात येईल,' असेही त्यांनी सांगितले.

# प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लिपिकाच्या निष्काळजीपणा मुळे जवळपास ५० आरोग्य कर्मचाऱ्यांची दिवाळीत शिमगा

अक्कलकोट/प्रतिनिधीः प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी गोड व्हावी म्हणुन शासनामार्फत या कर्मचाऱ्यांना दिवाळी पुर्वी अँग्रिम अँडवान्स म्हणून काही रक्कम दिली जाते. अक्कलकोट तालुक्यात तीन प्राथमिक आरोग्या केंद्राच्या लिपिकाच्या निष्काळजीपणा मुळे चप्पळगाव, नागणसुर, आणि शिरवळ या तीन आरोग्य केंद्रातील जवळपास ५० कर्मचाऱ्यांना दिवाळी होऊन दहा दिवस झाले तरी अद्यापही अँग्रिम मिळाले नाही. त्यामुळे या केंद्रातील कर्मचारी यांची दिवाळीत शिमगा झाली. पैसेच नसल्याने या कर्मचाऱ्यांना फराळ, नवीन कपडे घेता आले नाही. दिवाळी संपुन ८ ते १० दिवस झाले तरी अध्यापही अँग्रिम मिळाले नाही.

एक तर आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांनाचे पगार वेळेवर होत नसल्याने त्यांना अनेक अडचणीना तोंड द्यावे लागते. त्यातच शासनाने दिवाळी साठी दिलेलं अँग्रिम तरी मिळेल म्हणून आशा लावुन बसलेल्या कर्मचाऱ्यांना लिपिकाच्या निष्काळजीपणा मुळे तेही मिळाले नाही. त्यामुळे मुळे सर्वात मोठा सण असलेल्या दिवाळी ही करता आले नाही. अशा निष्काळजीपणा करणाऱ्या लिपिका वर कारवाई व्हावी अशी मागणी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी करत आहेत.

विस्तार अधिकारी प्राथमिक

आम्ही तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र साठी निधीची मागणी केली होती. त्यात किती निधी मिळाले हे माहीत नाही. यांची चौकशी करून उरलेल्या केंद्रालाही लवकरच अँग्रिम देण्याचा प्रयत्न करु.– **महेश भोरे, तालुका आरोग्य विस्तार अधिकारी**

# शिरोळ तालुका शेतकरी कृती समितीच्या वतीने शिरोळ तहसीलदार यांना निवेदन देऊन ठिय्या आंदोलन सुरू




शिरोळ/प्रतिनिधीः शिरोळ तालुका येथे शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष रामभाऊ तात्या डांगे यांच्या अध्यक्षतेखाली शिरोळ तहसीलदार येथे तहसीलदार सचिनकुमार हेळकर यांना निवेदन देऊन लवकरात लवकर साखर कारखाने चालू करावेत अशी मागणी केली.

या आंदोलनामध्ये शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. यंदा पावसाने दांडी मारल्यामुळे विहीरीला पाणी कमी आले आहे. यातच या आंदोलनामुळे ऊस गळीत हंगाम पुढे जात आहे. यामध्ये शेतकरी भरडला जात आहे. या कृती समितीच्या वतीने उपोषण सुरू करण्यात आले. शासन व कारखानदार यांनी लवकरात लवकर तोडगा काढावा अशी मागणी आता जोर धरत आहे .

या आंदोलनामध्ये ऊस उत्पादक, शेतकरी ,कामगार, शेतमजूर ,मोठ्या प्रमाणात महिला सहभागी झाल्या. ऊस गळीत हंगाम पुढे जात असल्यामुळे ऊस वजनामध्ये घट होत आहे यात शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. यात शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. राजू शेट्टी व सरकार यांनी लवकरात लवकर तोडगा काढावा अशी विनंती रामभाऊ तात्या डांगे यांनी केली. यावेळी बबन चौगुले, बाबासाहेब वनकोरे, केंदबा कांबळे ,शिवाजीराव देशमुख संचालक , खुशाल कांबळे, पिंटू चिगरे, भरमु बदामे, तुकाराम चिगरे, भरत निर्मळे, तसेच समस्त कृती समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा

मुंबई : शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासन आणि वैद्यकीय आरोग्य यंत्रणा असे दोन स्वतंत्र विभाग कार्यरत असणे गरजेचे आहे. याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक उपाययोजना करून त्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. या आढावा बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, आयुष संचालनालयाचे संचालक डॉ. रमण घुंगराळेकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, आरोग्य सेवेसाठी शासकीय रुग्णालये सामान्य माणसाला आधार वाटतात. यासाठी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सर्व आवश्यक सेवा-सुविधा आणि यंत्रसामग्री उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य दिले आहे. ज्या जिल्ह्यात नवीन वैद्यकीय महाविद्यालय मंजूर झाले आहेत ती शक्यतो शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी व्हावीत. यामुळे सामान्य माणसाला तातडीने वैद्यकीय उपचार मिळतील, यासाठीही वैद्यकीय शिक्षण विभागाने प्रयत्न करावेत. तसेच आरोग्य सेवा जलद मिळण्यासाठी डॉक्टरांसह अन्य रिक्त पदे लवकर भरावीत.

वैद्यकीय शिक्षण विभागाला आवश्यक सर्व सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण विभागाने आरोग्य सेवेमध्ये चांगले काम करावे.

भंडारा व वर्धा येथील नवीन शासकीय महाविद्यालय जागे संदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबधित जिल्हाधिकारी यांना बैठकीमधून दूरध्वनीवरून दिल्या.

बैठकीत चंद्रपूर, गोंदिया, नंदुरबार, सातारा, रायगड-अलिबाग, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, येथील नवीन शासकीय महाविद्यालय बांधकाम, जे. जे. रुग्णालयातील अतिविषेशोपचार रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथील बाह्यरुग्ण विभागाच्या बांधकामाबाबत आढावा घेण्यात आला.

वैद्यकीय शिक्षण विभागाने सादर केलेल्या पुरवणी मागण्या मंजूर व्हाव्यात, अशी मागणी वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ यांनी यावेळी केली. वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. वाघमारे यांनी सादरीकरणातून विभागाच्या कामकाजाचा आढावा सादर केला.

# ऑल इंडिया संपादक संघाच्या धाराशिव जिल्हा अध्यक्षपदी संपादक सुभाष घोडके यांची नियुक्ती

कळंब/प्रतिनिधी : गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले साप्ताहिक साक्षी पावन ज्योती संपादक सुभाष घोडके यांची कार्यनिष्ठता व पत्रकारितेबद्दलची एकनिष्ठता लक्षात घेऊन ऑल इंडिया संपादक संघ व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष करणजी बौद्ध यांनी संपादक सुभाष घोडके यांना धाराशिव जिल्हा अध्यक्ष पदाचा कारभार सोपवला आहे.



संपादक सुभाष घोडके यांच्या निवडीचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. तसेच आपल्या सहकारी बांधवांशी चर्चा करताना संपादक सुभाष घोडके यांनी आपण ऑल इंडिया संपादक संघ या संस्थेची एकनिष्ठ राहून संस्थेचे नाव पुढे नेहू तसेच ऑल इंडिया संपादक संघ या संघटनेच्या माध्यमातून गोरगरीब तसेच भटक्या विमुक्त जनतेचा आवाज उठऊ व न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या हक्कासाठी नेहमी तत्पर राहू असे आश्र्वासन दिले.

तसेच ऑल इंडिया संपादक संघाचे संस्थापक अध्यक्ष करण बौद्धजी यांनी धाराशिव जिल्ह्याची जी जबाबदारी सोपवली व जो विश्र्वास दाखवला त्यावर इमानदारी व तत्परतेने काम करेल असेही संपादक सुभाष घोडके यांनी वचन दिले. व संघटनेचे व सर्व शुभचिंतकाचे आभार मानले.

# माजी सैनिक नंदकुमार कांबळे यांना जातीवाचक शिवीगाळ व मारहाण करण्यात आलेल्या घटनेचे निषेध




टाकळीवाडी/प्रतिनिधीः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील शेतकरी माजी सैनिक नंदकुमार कांबळे यांचा ऊस वाळत असल्यामुळे त्यांनी स्वतःहून तोडणी स्वीकारली होती. परंतु शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना धक्काबुक्की करत त्यांच्या शर्टाला हात घालून शर्ट फाडून टाकला. तसेच जातीवाचक शिवीगाळ केली. त्यांना मारहाण करण्यात आली. पिकाची नासधूस केली. एका दलित शेतकरी यांच्यावर अत्याचार झाला. याचा निषेध कृषिमंत्री सदाभाऊ खोत यांनी केली. नंदकुमार कांबळे हे एक माजी सैनिक आहेत. देश सेवा करून हे आता शेती करत आहेत. हा काय गुन्हा झाला काय? असा सवाल सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केला. सदाभाऊ खोत यांनी नंदकुमार कांबळे यांच्या शेताची पाहणी केली. परिस्थिती पाहिली ऊसाला सध्या पाणी कमी पडत असल्यामुळे ऊस वाळत आहे. आणखीन असंच तोडणी पुढे गेली तर ऊस घटणार आहे. याचा तोटा शेतकऱ्याला सहन करावा लागणार आहे. आंदोलन कशाला म्हणतात हे सदाभाऊ खोत यांनी प्रत्यक्षात पटवून दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष रामभाऊ तात्या, माजी सरपंच खुशाल कांबळे, माजी सरपंच बाबासाहेब वनकोरे, केंदबा कांबळे, उदय कांबळे, बंडू भोरे, समस्त बहुजन समाज, शेतकरी वर्ग, गावातील नागरिक, उपस्थितीत होते.

# स्टार प्रवाहच्या तुझेच मी गीत गात आहे मालिकेत साहेबरावांची होणार एण्ट्री

## सुप्रसिद्ध अभिनेता अभिजीत केळकर साकारणार साहेबरावांची भूमिका

स्टार प्रवाहची 'तुझेच मी गीत गात आहे' मालिका अतिशय उत्कंठावर्धक वळणावर आहे. वैदेहीप्रमाणे हुबेहुब दिसणारी मंजुळा वैदेही नसून मंजुळाच असल्याचं सत्य मोनिकासमोर येणार आहे. रागाच्या भरात टोकाची भूमिका घेणाऱ्या मोनिकाची समजूत काढायची कशी हा मोठा प्रश्र्न मल्हारसमोर आहे. मंजुळा, मोनिका आणि मल्हार यांचं नातं दिवसेंदिवस गुंतागुंतीचं होत असतानाच आता मालिकेत आणखी एका नव्या पात्राची एण्ट्री होणार आहे. साहेबराव असं या नव्या पात्राचं नाव असून मंजुळासोबत लग्न करण्याचं त्याचं स्वप्न होतं. मात्र मंजुळाला साहेबरावासोबत लग्न कधीच मान्य नव्हतं. साहेबरावाने जबरदस्तीने मंजुळाशी साखरपुडा केला. मात्र मंजुळाने गावातून पळ काढून थेट मुंबई गाठली आणि तिचा योगायोगाने कामतांच्या घरात प्रवेश झाला. मात्र आता साहेबरावाला मंजुळा कामतांच्या घरी रहात असल्याचं समजलंय. त्यामुळे तिला मिळवण्यासाठी त्याचे पुन्हा प्रयत्न सुरु झाले आहेत. मंजुळाला मिळवण्यासाठी तो स्वराचं आयुष्यही पणाला लावणार आहे. साहेबरावाचा मनसुबा यशस्वी होणार का हे मालिकेच्या पुढील भागांमधून कळेलच. मात्र निरागस स्वराचं आयुष्य पुन्हा धोक्यात आल्यामुळे मालिकेत नवा ट्विस्ट आला आहे. सुप्रसिद्ध अभिनेता अभिजीत केळकर साहेबरावांची भूमिका साकारणार असून साहेबराव या



हटके नावाप्रमाणेच त्याचा लूकही हटके असणार आहे. अभिजीतने याआधी स्टार प्रवाहच्या पुढचं पाऊल आणि तुझ्या इश्काचा नादखुळा मालिकेतही लक्षवेधी भूमिका साकारली होती. तुझेच मी गीत गात आहे मालिकेत तो साकारत असलेला साहेबराव हा खलनायक नक्कीच वेगळ्या धाटणीच असेल. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका तुझेच मी गीत गात आहे रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

**स्टार प्रवाह संपर्क :**
**सोनाली शिगवण ९९३०९२३२४८**

# आ.समाधान आवताडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा




मंगळवेढा/प्रतिनिधीः पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे कार्यक्षम लोकप्रिय असे आमदार समाधान आवताडे यांच्या ४७ व्या वाढदिवसानिमित्त आमदार जनसंपर्क कार्यालय, मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबीरामध्ये ७४७ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जतन केली आहे. तसेच या वाढदिवसानिमित्त सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची नोंदणी व गावोगावी पशु आरोग्य तपासणी शिबिर आदी कार्यक्रमांनी उत्साही वातावरणामध्ये साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमाच्या शुभारंभप्रसंगी श्री.संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे यांच्या हस्ते स्व. महादेवराव आवताडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

रक्तदान हे श्रेष्ठदान हा मनी वसा बाळगून अखंड सेवाभावी वृत्तीने रक्तदान करणार्या अनेक अनामिक रक्तदात्यांमुळे कित्येक जीवांचे प्राण वाचण्यास मदत होते.

असेच सामाजिक दायित्वाचे भान राखत आपण पाणीदार आमदार आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरास भेट देऊन अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करत सामाजिक दायित्व जपण्याकरिता आपला सहभाग नोंदवला. त्याचबरोबर या वाढदिवसाच्या औचित्य साधून सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची काही जोडप्यांनी नोंद करून या विवाह सोहळ्यात आपला विवाह करण्याचे निश्रि्चत केले आहे. तसेच या वाढदिवसानिमित्त मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येक गावोगावी पशुवैद्यकीय विभागामार्फत पशु आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून अनेक पशुधनांची तपासणी व उपचार करण्यात आले.

**या रक्तदान शिबिरामध्ये रक्त संकलनासाठी सिविल हॉस्पिटल सोलापूर येथील रक्तपेढीचे आरोग्य कर्मचारी सहभागी झाले होते. सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर येथे सद्य काळात रक्ताचा फार मोठा तुटवडा निर्माण झाल्याने हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी रक्ताचे नितांत गरज असताना आमदार आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त हे शिबिर संपन्न झाल्याने सदर हॉस्पिटल मधील रक्ताचा तुटवडा काही प्रमाणात कमी होण्यास मोठी मदत झाल्याने सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर यांच्या वतीने आमदार समाधान आवताडे यांच्या कार्यकृतीचे विशेष कौतुक व कृतज्ञता व्यक्त करण्यात आले.**

यावेळी माजी पं. स सदस्य नवनाथ पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, जिल्हा नियोजन समिती प्रदीप खांडेकर, माजी उपसभापती धनंजय पाटील, दत्तात्रय जमदाडे, व्हा चेअरमन अंबादास कुलकर्णी, भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, संतोष मोगले, माजी संचालक सुरेश भाकरे, सचिन शिवशरण, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत पडवळे, भाजपा विधानसभा अध्यक्ष राजेंद्र सुरवसे, संचालक तानाजी काकडे, जगन्नाथ रेवे, माजी नगरसेवक कैलास कोळी, दादासाहेब ओमणे, दादा दोलतोडे, भारत निकम, विजय माने, भारत आटकळे, न. पा. प्राथ. शिक्षण मंडळ सदस्य दिगंबर यादव, शाम पवार, कार्यकारी संचालक मोहन पिसे, सिद्धेश्र्वर दत्तु, युवराज शिंदे, राजकुमार यादव, सुधाकर मासाळ, विनायक यादव, सतिश पवार, शिवाजी पटाप, सुदर्शन यादव, जनार्धन कोंडुभैरी, सुरेश मेटकरी, समाधान हेंबाडे, साहेबराव उगाडे, दत्ता साबणे, आदी मान्यवर, विविध गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विकास सोसायटी चेअरमन संचालक, एस एम अवताडे कन्स्ट्रक्शन कंपनी, आवताडे शुगर, आवताडे स्पिनर्स या व्यावसायिक संकुलातील अधिकारी, कर्मचारी, आमदार जनसंपर्क कार्यालय पंढरपूर मंगळवेढा स्टाफ, ब्लड बँक वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, दोन्ही तालुक्याच्या विविध गावातील ग्रामस्थ व नागरिक आणि हितचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते.

# भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना : प्रांताधिकारी गजानन गुरव




पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिक यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने व मंदीर समितीने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिली.

कार्तिक वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय येऊ नये यासाठी पत्राशेड, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट,, नगरपालिका या पाच ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे मुख्य नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. आपत्ती व्यवस्थापन कक्षात नेमणूक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी असे निर्देश प्रांताधिकारी गुरव यांनी दिले.

तहसिल कार्यालयात मुख्य नियंत्रण कक्षाची स्थापना

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक ०२१८६-२२३५५६

कार्तिकी शुध्द एकादशी गुरूवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी असून, यात्रा कालावधी दि.१४ ते २७ नोव्हेंबर असा राहणार आहे. या कालावधीत यात्रा सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ होऊ नये यासाठी ५ पाच ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे मुख्य नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. मुख्य नियंत्रण कक्ष दि. १७ ते २७ नोव्हेंबर २०२३ या वारी कालावधीत २४ तास सुरु राहणार असून, या नियत्रंण कक्षात विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांची नेमणक करण्यात आली आहे. पत्राशेड, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, नगरपालिका या आपत्ती व्यवस्थापन कक्षास काही अडचणी आल्यास या अडचणी मुख्यनियंत्रण कक्षात नियुक्त असलेल्या संबधित विभागामार्फत तात्काळ सोडविण्यात येणार आहेत. तसेच वारकरी भाविक काही अडचणी आल्यास नियंत्रण कक्षाच्या ०२१८६६-२२३५५६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी केले आहे.

# वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट या जागतिक बौद्ध संघटनेच्या मानद उपाध्यक्षपदी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची निवड



मुंबई/विशेष प्रतिनीधी : रिपब्लिकन पक्षाचे रष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांची प्रमुख जागतिक बौद्ध संघटना असलेल्या वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या कायमस्वरूपी जागतिक मानद उपाध्यक्षपदी आज अधिकृत निवड करण्यात आल्याची घोषणा बँकॉक येथे करण्यात आली. बँकॉक येथे वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या कार्यकारी परिषदेत आज वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट चे अध्यक्ष फ्लॅोप थेयरी यांनी ना.रामदास आठवले यांची वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या जागतिक मानद उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा आज केली।यावेळी जगभरातील ६० बौद्ध देशांचे बौद्ध प्रतिनिधी उपस्थित होते.

वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या जागतिक कार्यकारी समिती च्या दिवसीय धम्म परिषदेला आज दि.२१ नोव्हेंम्बर २०२३ रोजी बाँकोक येथील हॉटेल मध्ये प्रारंभ झाला.दि.२१ते २३ नोव्हेंबर २०२३ पर्यंत बँकॉक मध्ये वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट ची तीन दिवसीय कार्यकारी परिषद चालणार आहे. आज या परिषदेच्या पहिल्या दिवशी ना.रामदास आठवले यांची वर्ल्ड फेलीशीप ऑफ बुद्धिस्ट च्या जागतिक मानद उपाध्यक्ष पदी निवड जाहीर करण्यात आली. या नियुक्ति बद्दल जगभरातील बौद्ध प्रतिनिधींनी ना.रामदास आठवले यांचे अभिनंदन केले आहे.

वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट या जागतिक बौद्ध संघटनेला ऐतिहासिक महत्व आहे. संपूर्ण जगात वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट प्रमुख बौद्ध संघटना आहे. या संघटनेच्या स्थापना बैठकीला १९५० मध्ये बोधिसत्व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. दर दोन वर्षांनी वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्टची जागतिक बौद्ध धम्म परिषद आयोजित केली जाते. १९५६ मध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी काठमांडू नेपाळ येथे आणि १९५४ मध्ये रंगून ब्रह्मदेश ( म्यानमार) येथे वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेत सहभाग घेतला होता. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बोधीसत्व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ऐतिहासिक बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्मचक्र प्रवर्तन घडविले. तो वारसा घेऊन आम्ही भारतात आणि जगभरात बौद्ध धम्माचे काम करीत आहोत. जगाच्या कल्याणासाठी जगाला युद्ध नको तो बुद्ध हवा आहे. त्यामुळे बौद्ध धम्माने दिलेल्या शांती अहिंसा सत्य समता या विचारांचा प्रसार करीत बुद्ध धम्माच्या प्रसारासाठी धम्म परिषद आयोजित करणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतात मुंबई आणि दिल्ली येथे वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट तर्फे जागतिक बौद्ध धम्म परिषद आयोजित केली जावी अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी आज बँकॉक येथे सुरू झालेल्या वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या धम्म परिषदेत केली. वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्टच्या जागतिक मानद उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्यानंतर सत्काराला उत्तर देताना ना.रामदास आठवले बोलत होते.

भारतात दलित बहुजन गरीब शोषित वर्गासाठी केलेल्या भरीव कार्यामुळे तसेच भारतात बौद्ध धम्मासाठी सतत काम करीत असल्यामुळे बौद्ध नेते म्हणून ही त्यांचे योगदान चांगले असल्याची दखल प्रमुख जागतिक बौद्ध संघटना असलेल्या वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट ने घेतली आहे. या धम्मपरिषदेत ना.रामदास आठवले यांच्या कार्याचा गौरव म्हणून वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट या जागतिक बौद्ध धम्म संघटनेच्या ऑनररी व्हाईस प्रेसिडेंट ( मानद उपाध्यक्ष ) पदी कायमस्वरूपी नियुक्ती आज करण्यात आली.

केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे दि.२० नोव्हेंम्बर ते २५ नोव्हेंबर असे ५ दिवस बँकॉक दौऱ्यावर असून त्यांच्या सोबत त्यांच्या पत्नी सौ.सीमाताई आठवले; पुत्र कुमार जित आठवले; युनायटेड बुद्धिस्ट फेडरेशन चे अध्यक्ष अविनाश कांबळे; रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदे चे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे हे सोबत आहेत. वर्ल्ड फेलीशीप ऑफ बुद्धिस्टचे अध्यक्ष फेलेप थियरी यांनी रिपब्लिकन पक्षा चे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचे भारतातील काम खूप मोठे आहे. जागतिक स्तरावर ना.रामदास आठवले यांचे काम आहे. त्यांच्या नेतृत्वाची वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट ला गरज आहे. त्यामुळे वर्ल्ड फेलीशीप ऑफ बुद्धिस्ट च्या ऑनररी मानद उपाध्यक्ष पदी ना.रामदास आठवले यांची निवड करीत असल्याचे आज ६० देशांच्या बौद्ध प्रतिनिधींसमोर सांगत ना.रामदास आठवले यांचा गौरव केला.

वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या जागतिक कार्यकारी परिषदेत जगभरातील ६० बौद्ध देशांचे प्रमुख प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. या ६० देशांच्या बौद्ध प्रतिनिधींच्या उपस्थितीत वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट च्या जागतिक मानद उपाध्यक्ष पदी ना.रामदास आठवले यांची आज अधिकृत निवड करून सन्मान करण्यात आला.जगभरात निर्माण झालेल्या युद्धजन्य स्थितीतुन जग कसे बाहेर पडून शांती च्या मार्गावर जाईल;

शांती अहिंसा मानवता सत्य समता या बुद्ध विचारांचा प्रसार करून जगभर मानव जातीच्या कल्याणासाठी बौद्ध धम्माचा प्रसार वाढवावा याबाबत ही या आंतराष्ट्रीय बौद्ध परिषदेत विचार विनिमय करण्यात आला. या जागतिक बौद्ध संघटनेच्या उपाध्यक्ष पदी या पूर्वींही ना.रामदास आठवले यांची निवड झाली होती. जागतिक उपाध्यक्षपदाचा कार्यकाळ हा ४ वर्षांचा असतो.मात्र यंदा ना.रामदास आठवले यांना वर्ल्ड फेलीशीप ऑफ बुद्धिस्ट चे जागतिक मानद उपाध्यक्ष पदाचा बहुमान देण्यात आला असून या पदासाठी कोणतीही कालमर्यादा ठेवण्यात आलेली नाही. वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट चे कायमस्वरूपी जागतिक मानद उपाध्यक्ष म्हणून ना.रामदास आठवले यांची आज निवड जाहीर करण्यात आली.

# धनगर समाजाच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक : मंत्री शंभूराज देसाई



मुंबई : राज्य शासन धनगर समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यांबाबत सकारात्मक असून धनगर समाजाचे प्रश्र्न लवकरच मार्गी लावण्यात येतील, असे राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आणि इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत धनगर समाजाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मंत्रालयात आढावा आज बैठक झाली. धनगर समाजाच्या विविध संघटनांनी केलेल्या मागण्यांबाबत यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून आवश्यक त्या सूचना दिल्या.


मंत्री श्री. देसाई म्हणाले की, धनगर समाजाच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे अभ्यासगट गठित करण्यात आला आहे. त्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. मध्य प्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यांतील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या जाती-जमातींना जात प्रमाणपत्र व अन्य लाभ उपलब्ध करून दिलेले आहेत. त्या संदर्भातील कार्यपद्धतीचा अभ्यास धनगर समाजाच्या प्रतिनिधींसह राज्यातील अधिकाऱ्यांचा समावेश असणारा हा अभ्यासगट करणार आहे. हा अभ्यासगट तीन महिन्यांत शासनास अहवाल सादर करणार आहे. तसेच निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू असल्याचेही मंत्री श्री .देसाई यांनी सांगितले. अभ्यासगटाचा अहवाल आल्यानंतर समिती राज्याच्या महाधिवक्ता यांच्याशी त्याबाबत सविस्तर चर्चा करेल. तसेच येत्या १५ दिवसांत धनगर समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेण्यात येईल, अशी माहिती मंत्री श्री. देसाई यांनी दिली. धनगर समाजाचे प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी शासन प्रयत्नशील असून समाजाच्या संघटनांकडून करण्यात येत असलेले उपोषण थांबविण्यात यावे, असे आवाहन मंत्री श्री. देसाई आणि मंत्री श्री. सावे यांनी यावेळी केले.

या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सो. ना. बागूल, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे उपसचिव कैलास साळुंखे, गृह विभागाचे उपसचिव राजेश गोविल, पशुसंवर्धन विभागाचे उपसचिव नि. भा. मराळे, ग्रामविकास विभागाचे उपसचिव पो. द. देशमुख, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांच्या परिपूर्तीबाबत आज मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत पालकमंत्री मंत्री श्री. देसाई यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे साताराचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी व पोलीस अधीक्षक समीर शेख यांना निर्देश दिले. २३ सप्टेंबर २०२३ रोजी माण (दहिवडी) येथे धनगर आरक्षण समितीच्या कार्यकर्त्यांनी मंत्री श्री. देसाई यांनी आश्र्वस्त केल्यानंतर उपोषण मागे घेतले होते. त्यानंतर ९ ऑक्टोबर २०२३ रोजी धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांबाबत मंत्री श्री. देसाई यांनी जिल्ह्यास्तरीय बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. त्याबाबत आजच्या बैठकीत आढावा घेण्यात आला

घरकुल योजनांचे लाभ धनगर समाजाला मिळावेत, यादृष्टीने मंत्री श्री. देसाई यांनी निर्देश दिले होते. त्यात ७४ लाभार्थींना घरकूल योजनेचा लाभ जिल्ह्यात देण्यात आला आहे. तसेच येत्या काळात लाभार्थी संख्या वाढवण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी सांगितले. तसेच मेंढपाळांवर होणाऱ्या हल्ल्यांची सत्यता पडताळून पाहावी आणि अशा प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन पोलीस विभागाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी दिली.

# आम्हा पुणेकरांचे अन्नछत्र मंडळ हे श्रद्धास्थान : पै.शिवराज राक्षे




अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले स्वामी कार्य उल्लेखनीय असून, न्यासाच्या परिसरातील स्वच्छता, नम्रसेवा व व्यवस्थापन उत्तम आहे. आम्हा पुणेकरांचे अन्नछत्र मंडळ हे श्रद्धास्थान असल्याचे मनोगत दुहेरी महाराष्ट्र केसरी विजेता पै. शिवराज राक्षे, पुणे यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी मंडळाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, सौरभ मोरे, दिनेश हळगोदे, प्रविण घाटगे, गोटू माने, दत्ता माने, बबुशा महिंद्रकर, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.